पिंपरी चिंचवड महानगरपालिका.
पिंपरी,पुणे१८. मध्यवर्ती भांडार विभाग,
क्रमांक-मभां/८/कावि/ १७६/२०१५
दिं- २३/३/२०१५.

विषय- सन २०१५-१६ करिता कर्मचा-यांना रेनकोट व रेनसुट पावसाळी साधने खरेदी बाबत...

परिपत्रक

पिंपरी चिंचवड महानगरपालिका गणवेश देय नियमावली नुसार नियमीत वेतनश्रेणीत काम करणा-या गणवेश देय कर्मचा-यांना दर दोन वर्षानी पावसाळी साधनांचे वाटप करणेत येते. त्यानुसार कर्मचा-यांना सन २०१५-१६ या कालावधीत पावसाळी साधने देय आहेत. सदर कर्मचा-यांना पावसाळी साहित्य खरेदी करणेची कार्यवाही भांडार विभागामार्फत सुरु करणेत आलेली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरिल कर्मचा-यांचे गणवेशाबाबतचे विनियम नुसार ज्या कर्मचा-यांना पावसाळी रेनकोट व रेनसुट साधने देय आहेत. त्यानुसार शाखाप्रमुख/विभागप्रमुख यांनी आपल्या कडील नियमीत वेतनश्रेणीतील कर्मचा-यांची माहिती (तेरीज पत्रकात) दि.७/०४/२०१५ अखेर मुदतीत खालील प्रमाणे मध्यवर्ती भांडार विभागात पाठविणेत यावी.

| अ.क्रं | कर्मचा-यांचे नाव | पदनाम | रेनकोट व रेनसुट साईज- M,L,XL,XXL. | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |

महानगरपालिकेच्या आस्थापनेवरिल कर्मचा-यांचे गणवेशाबाबतचे विनियम मध्ये ज्या पदनामांचा समावेश करणेत आलेला नाही अशा कर्मचा-यांची माहिती पाठविणेत येवु नये. ज्या विभागांनी पावसाळी साधने देण्याबाबत मा. आयुक्त सो. याची मान्यता घेतली असेल अशा विभागांनी माहिती सोबत मान्य प्रस्तावाची सत्य प्रत जोडुन पाठवावी. उक्त मुदतीत माहिती प्राप्त न झालेस व सदर कारणास्तव कोणत्याही कर्मचा-यांस पावसाळी साधने न मिळालेस त्यास मध्यवर्ती भांडार विभाग जबाबदार राहणार नाही याची नोंद घेणेत यावी. तसेच सदर साहित्यांची अचुक माहिती आपले विभागामार्फत विभागप्रमुखांचे स्वाक्षरीने एकत्रीत करुन पाठविण्यात यावी.

तेरीजपत्रक
रेनसुट देय एकुण पुरुष-- M, L, XL ,XXL, XXXL
रेनकोट देय एकुण महिला— M, L, XL ,XXL, XXXL

सही/-
सह आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११०१८.

प्रति,
सर्व शाखाप्रमुख/विभागप्रमुख
-----------------------------

सही/-
भांडार अधिकारी
मध्यवर्ती भांडार विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८